## ePaper ब्रिटनचे माजी प्रिन्स अँड्र्यू यांना अटक, ब्रिटनमध्ये खळबळ



वर्ष - 9 । अंक - 175 UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM शुक्रवार, दि. 20 फेब्रुवारी 2026 पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती MAHAENEWS.COM लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 2 वरुन...

कंठ दाटला, डोळे पाणावले!

## छत्रपतींच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग; मुख्यमंत्री

# शिवनेरीवर शिवजन्मोत्सव साजरा!

**महाईन्यूज । पुणे**

**छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या अधिपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. 'हे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धर्मासाठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले. पोर्तुगीजांवर विजय मिळवून पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, अशा शब्दात त्यांनी महाराजांचे द्रष्टेपण मांडले.

शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, पंतप्रधानांच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून २७ देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत. शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठा सेवा संघाच्या निवेदनावर राज्य सरकार सकारात्मक काम करेल, तसेच मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर विचार करण्यात येईल, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री फडणवीस राज्यातील आणि जगभरातील शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

## राजधानीत शिवजयंतीचा सोहळा अभूतपूर्व उत्साहात



'जय भवानी, जय शिवाजी'चा गगनभेदी जयघोष, ढोल-ताशांचा गजर, तुतारींचा निनाद आणि शाहिरी पोवाड्यांच्या साथीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज देशाच्या राजधानीत अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय सेनेच्या तुकडीने छत्रपती शिवाजी महाराजांना विशेष मानवंदना दिली. दिल्लीतील शिवजयंती राष्ट्रोत्सव समितीतर्फे कस्तुरबा गांधी मार्गस्थित नवीन महाराष्ट्र सदनात सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संभाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि खासदार विशाल पाटील, निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला, निवास आयुक्त गुंतवणूक सुशील गायकवाड, माहिती संचालक हेमराज बागुल यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव आणि पाळणा पूजन आणि पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शिवजयंती राष्ट्रोत्सव समिती, नवी दिल्ली यांनी तयार केलेल्या 'शिवकालीन दर्शिका 2026' या कॅलेंडरचे प्रकाशन संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. या कॅलेंडरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते निर्वाणापर्यंत घडलेल्या ऐतिहासिक घटनांचा तारखेनुसार सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. नाशिकचे शिवराय ढोल पथक, लेझीम, वारकरी दिंडी आणि झेंडा पथकाच्या निनादात महाराष्ट्र सदन परिसरात भव्य 'शिव-शोभायात्रा' काढण्यात आली.

# कंठ दाटला, डोळे पाणावले!

## सुनेत्रा पवारांनी शिवनेरीवर शब्द देताना फडणवीस-शिंदेही झाले भावूक

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्राचेच नव्हे, तर संपूर्ण भारताचे आराध्यदैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. किल्ले शिवनेरीवर शिवरायांचा जन्मोत्सव सोहळा पारंपारिक थाटात पार पडला. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांचा हा पहिलाच शासकीय कार्यक्रम होता. या ऐतिहासिक क्षणी भाषण करताना सुनेत्रा पवार अत्यंत भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.**



"आज दादांची उणीव भासत आहे," असे म्हणताना त्यांचा कंठ दाटून आला. अजितदादांच्या पश्चात ही जबाबदारी निभावताना त्यांनी शिवनेरीच्या साक्षीने रयतेच्या सेवेचा संकल्प सोडला. त्यांच्या या भावूक भाषणामुळे शिवनेरीवर उपस्थित असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील हेलावून गेले होते.

"ज्या ठिकाणी दादा (अजित पवार) उभे राहायचे, आज तिथे उभे राहून बोलताना मनावर प्रचंड दडपण आणि मनात दाटून आलेल्या आठवणी आहेत," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतानाच्या कठीण प्रसंगाचा खुलासा करताना त्या म्हणाल्या की, त्या वेळी माझ्या डोळ्यासमोर केवळ राजमाता जिजाऊंचे चित्र होते, ज्यांनी संकटातही डगमगून न जाण्याची प्रेरणा दिली.

### रयतेला दिला पहिला शब्द:

शिवनेरीच्या पवित्र भूमीची साक्ष काढून सुनेत्रा पवार यांनी रयतेला वचन दिले की, "शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांचा वारसा मी कधीही सोडणार नाही". अजितदादांनी सुरू ठेवलेली विकासाची कामे, विशेषतः शिवनेरी विकास आराखडा आणि गडकिल्ल्यांचे संवर्धन, आपण त्याच गतीने पुढे नेऊ, असा शब्द त्यांनी यावेळी दिला.

### फडणवीस आणि शिंदेंकडून सांत्वन:

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. सुनेत्रा पवार भावूक झाल्याचे पाहून दोन्ही नेत्यांनी त्यांचे सांत्वन केले आणि सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली.


## कात्रजच्या 'डेथ ट्रॅप'वर मृत्यूचं थैमान! डंपरने ८ वाहनांना उडवलं

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-सातारा महामार्गावरील कात्रज बाह्यवळण रस्ता पुन्हा एकदा भीषण अपघाताने हादरला असून हा परिसर जणू 'डेथ ट्रॅप' बनला आहे. बुधवारी सायंकाळी खडीने भरलेल्या एका भरधाव डंपरने नियंत्रण सुटल्यामुळे तब्बल ८ वाहनांना पाठीमागून जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, धडकेनंतर काही क्षणांतच डंपरने भीषण पेट घेतला आणि तो पाहता-पाहता आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. सुदैवाने, या थरारक घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, ४ ते ५ प्रवासी गंभीर जखमी झाले असून वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.**







या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक बराच वेळ विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, हा डंपर (क्रमांक MH12 WJ 6916) नवीन कात्रज बोगद्याकडून नवले पुलाच्या दिशेने जात होता. जांभुळवाडी बोगद्याजवळ चालकाचे डंपरवरील नियंत्रण सुटले आणि त्याने समोर असलेल्या कार व एसयूव्हीसह ८ वाहनांना अक्षरशः चिरडत नेले. वाहनांना उडवल्यानंतर सुमारे ३०० मीटर पुढे गेल्यावर डंपरच्या मागील बाजूने अचानक पेट घेतला. टायरचा घर्षणामुळे किंवा इंजिनमधील बिघाडामुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. आगीचे लोट इतके उंच होते की महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले.

### वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान...

या अपघातात वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, त्यातील ४ ते ५ प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलवले आहे. जांभूळवाडी बोगदा ते नवले पूल हा पट्टा आता अपघातांचे केंद्र बनला आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये संतापाची लाट असून, प्रशासनाने येथे कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# पिंपरी-चिंचवडकरांना आता रोज पाणी!

## महापौर रवि लांडगे यांचे आश्वासन : 6 महिन्यांत करणार अंमलबजावणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. नियमित पाणीपुरवठ्यासाठी भामा-आसखेड धरणातून येणाऱ्या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यास प्राधान्य देऊ. पवना बंदिस्त जलवाहिनीबाबत मावळातील बाधित शेतकरी, लोकप्रतिनिधींशी संवाद साधून, प्रशासकीय अडथळे दूर करून प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करू. दररोज पाणी देण्याचे नियोजन सहा महिन्यांत करू, असा निर्धार नूतन महापौर रवी लांडगे यांनी बुधवारी 'लोकमत'च्या व्यासपीठावर व्यक्त केला. 'लोकमत'च्या पिंपरी-चिंचवड कार्यालयात आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात महापौर लांडगे यांनी पाणी, कचरा, रस्ते, पर्यावरण आणि आर्थिक शिस्त याबाबत ठोस भूमिका स्पष्ट केली.**




ते म्हणाले की, भामा-आसखेडच्या जलवाहिनीचे काम पुढील सहा महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, त्यानंतर शहराला दररोज पाणी देणे शक्य होईल.

सध्या प्रत्येक सोसायटीला एकच नळजोडणी दिल्याने पाणी वितरणात तफावत निर्माण होते.



त्यामुळे प्रत्येक फ्लॅटला स्वतंत्र नळजोडणी देण्याचा पर्यायही तपासला जाणार आहे. नियमित पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर 'टँकर लॉबी'लाही आपोआप आळा बसेल.

महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे, खड्डेमुक्त रस्ते आणि घराघरात कचरा वर्गीकरण सक्तीचे करण्यावर भर राहील. कुदळवाडी येथील अतिक्रमणांवरील कारवाईनंतर आता लघु उद्योजकांशी चर्चा करून त्यांच्या पुनर्वसनाचा मार्ग काढला जाईल.

> "गुरुदेव श्री "सहा महिन्यांत पिंपरी-चिंचवडकरांना दररोज पाणी देणे हे आमचे ठाम उद्दिष्ट आहे. प्रत्येक नागरीकाच्या घरात नियमित पाणी पोहोचेल, आणि शहर पाणीसमस्या मुक्त होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### नवीन विकासकामे निधी तपासूनच

लांडगे म्हणाले की, दुर्गा टेकडीवर ऑक्सिजन पार्क उभारणी, मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि हरित शहर संकल्पनेवर भर दिला जाणार आहे. इंद्रायणी व पवना नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी दोषींवर कठोर कारवाई होईल. महापालिकेवरील कर्ज लक्षात घेऊन सुरू असलेली कामे पूर्ण करण्यावर प्राधान्य देण्यात येईल. निधी तपासूनच नवीन विकासकामे हाती घेऊ. सीएसआर निधीचा वापर आणि थकबाकी वसुलीसाठी उपाययोजना केल्या जातील.



# गुरुदेव श्री श्री रविशंकर यांचा आमदार महेश लांडगे यांना दिव्य आशिर्वाद!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आमदार महेश लांडगे यांना आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांची प्रत्यक्ष भेट घेण्याचा व त्यांच्या करस्पर्शातून आशिर्वाद घेण्याचा दिव्य योग लाभला. गुरुदेवांच्या सान्निध्यात बसताना, "गुरू म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणारी ज्योत आणि मनातील गोंधळ शांत करून आत्म्याशी भेट घडवणारा सेतू" ही अनुभूती आमदार लांडगे यांनी प्रत्यक्ष जाणवली, असे त्यांनी सांगितले.**



गुरुदेवांच्या स्मितहास्यातून मिळालेल्या करुणा आणि आश्वासक शक्तीमुळे मनातील सर्व ताण, भीती आणि संभ्रम क्षणात विरून जातात, असे आमदार लांडगे यांनी अनुभवाचे वर्णन केले. या भेटीत श्री. श्रेअंश चौधरी, श्री. ओंकार सावंत, श्री. सूर्यकांत जाधव, श्री. अभिजित भानाप, श्री. गिरीश देशमुख तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक स्वामी प्रणवानंदजी उपस्थित होते.

यावेळी आमदार लांडगे यांनी बेंगलुरु- कर्नाटक येथील "श्री श्री गुरूकुलम" वेद आगम संस्कृत महापाठशाळेची पाहणी केली. येथे विद्यार्थ्यांना वेद, आगम, संस्कृत, ज्योतिष, योग, संगीत, वैदिक गणित व शिल्पशास्त्र यांचा मोफत अभ्यासक्रम उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना गुरु-शिष्य परंपरेतून शिक्षण दिले जाते, जे प्राचीन भारतीय संस्कृती आणि जीवनमूल्यांचे संवर्धन करीत आहे.

तसेच, आमदार लांडगे यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या श्री श्री गौशाला येथे भारतीय गोवंश संवर्धनाचे कार्य पाहिले. त्यांनी गौशाळेतील जैविक पद्धतीने चालणारे प्रकल्प आणि गोवंशापासून मिळणारी उत्पादने पाहून कौतुक व्यक्त केले. आमदार लांडगे म्हणाले, "गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली समाजात प्रेम, शांतता आणि सकारात्मक जीवन मूल्ये रुजवण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगची कार्ये अत्यंत प्रेरणादायी आहेत. या भेटीमुळे मला समाजसेवेत नवीन दिशा व ऊर्जा मिळाली आहे."


> "गुरुदेव श्री श्री रविशंकर यांची प्रत्यक्ष भेट आणि त्यांच्या आशिर्वादाने मनात एक अद्भुत स्थैर्य आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली समाजात प्रेम, शांतता आणि आदर्श जीवनमूल्ये रुजवणे ही खरी प्रेरणा आहे. हा अनुभव केवळ व्यक्तिशः भेट नव्हता, तर अंतर्मनाचा एक दिव्य प्रवास होता, ज्याने माझ्या समाजसेवेला नवीन दिशा आणि ऊर्जा दिली आहे. गुरुदेवांच्या कृपेने अशक्यही शक्य होऊ शकते, आणि या भेटीने मला याचा अनुभव थेट अनुभवायला मिळाला."
>
> - महेश लांडगे, आमदार, पिंपरी-चिंचवड, पुणे.




**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भारत मंडपममध्ये 'इंडिया AI इम्पॅक्ट समिट 2026' चे औपचारिक उद्घाटन केले. या भव्य समिटमध्ये जगभरातील अनेक राष्ट्रप्रमुख, तज्ज्ञ आणि उद्योगक्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते. फ्रान्सचे इमॅनुएल मॅक्रो, ब्राझीलचे लूला डि सिल्वा आणि संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांसह अनेक आंतरराष्ट्रीय मान्यवरांनी समिटला विशेष महत्त्व दिले.**

# भारतातील AI भविष्याची दिशा!

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या उद्घाटन भाषणात भारताची कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) बाबतीतची स्पष्ट भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, AI ही केवळ तांत्रिक क्रांती नाही, तर मानवी इतिहासाची दिशा बदलणारी शक्ती आहे. भारताने नेहमी नव्या तंत्रज्ञानाचे स्वागत केले आहे आणि त्याच्या विकासात सक्रिय योगदान दिले आहे. मोदी म्हणाले, "ही परिषद ज्या भारतात आयोजित होत आहे, तो देश जगातील सहाव्या भागातील लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतो. भारताकडे जगातील सर्वात मोठी युवा लोकसंख्या आणि विशाल कौशल्यसंपन्न मनुष्यबळ आहे." त्यांनी भर दिला की देशातील वाढती टेक्नॉलॉजी इकोसिस्टम आणि स्टार्टअप संस्कृती AI क्षेत्रात भारताला जागतिक




नेतृत्वाच्या दिशेने घेऊन जाऊ शकते.

पंतप्रधान मोदी यांनी भारताची AI दृष्टी 'सर्वजन हिताय – सर्वजन सुखाय' या तत्त्वावर आधारित असल्याचे स्पष्ट केले. AI मुळे माणूस फक्त 'डेटा पॉइंट' किंवा 'रॉ मटेरियल' बनू नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे. म्हणून AI तंत्रज्ञान सर्वांसाठी सुलभ, समावेशक आणि सबलीकरणाचे माध्यम असावे, तसेच लोकशाहीकरणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवले जावे, असे ते म्हणाले. युवा पिढीने AI चे उत्स्फूर्त स्वागत केले आहे, असे मोदी यांनी नमूद केले. समिटमधील AI प्रदर्शन विभागात तरुणांचा विशेष सहभाग दिसून आला. 100 हून अधिक देशांमधून प्रतिनिधी सहभागी झाले असून जागतिक स्तरावरील तज्ज्ञ आणि उद्योगक्षेत्रातील नेत्यांनीही आपली उपस्थिती नोंदवली. मोदी यांनी या उपस्थितीला भविष्यातील नवकल्पनांबाबत सकारात्मक संकेत मानले.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही यावेळी भाषण करून AI तंत्रज्ञान देशातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. येणाऱ्या पिढ्यांसाठी AI मुळे निर्माण होणाऱ्या संधी आणि मूल्यांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

मोदी यांनी आपल्या भाषणाच्या शेवटी मानवी इतिहासातील निर्णायक तांत्रिक टप्प्यांचा उल्लेख करत सांगितले की, काही तांत्रिक बदलांनी संपूर्ण शतकाची दिशा ठरवली आहे आणि AI ही अशीच ऐतिहासिक क्रांती ठरणार आहे. ही फक्त यंत्रांना सक्षम करणार नाही, तर मानवी क्षमताही अनेक पटींनी वाढवेल.

'इंडिया AI इम्पॅक्ट समिट 2026' मुळे भारताच्या डिजिटल आणि तांत्रिक भविष्यास नवी गती मिळेल, असा विश्वास या परिषदेत व्यक्त करण्यात आला. AI तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण, समावेशी विकास आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यावर भारताने आपली भूमिका ठामपणे मांडली आहे. या समिटमुळे देशाचा AI क्षेत्रातील जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करण्याचा मार्ग अधिक स्पष्ट झाला आहे आणि युवा पिढीमध्ये नवकल्पना आणि सर्जनशीलतेसाठी नवी ऊर्जा निर्माण झाली आहे.

या समिटमुळे भारत AI क्षेत्रात एक जागतिक केंद्र म्हणून उभा राहण्यास सज्ज आहे, ज्यामुळे तंत्रज्ञानाचे लाभ समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचतील आणि AI च्या माध्यमातून 'सर्वजन हिताय – सर्वजन सुखाय' या तत्त्वाची खरी अंमलबजावणी होईल.

## प्रासंगिक »

### चांगला राजा

***एकदा एका तळ्यातला बेडकांना वाटले, की आपल्याला एक राजा हवा. म्हणून त्यांनी देवाकडे तशी मागणी केली.***

तेव्हा देवाला हसूच आले व त्याने 'हा घ्या राजा !' म्हणून एक लाकडी ओंडका तळ्यात टाकला. तो पाण्यावर पडताच पाणी उसळले.

ते पाहून सगळे बेडूक घाबरले आणि बाजूला जाऊन बसले. थोड्या वेळाने पाणी शांत झाल्यावर तो ओंडका काही हालचाल करीत नाही असे पाहून त्याच्या-वर चढले व उड्या मारू लागले. मग त्यांना वाटले की या राजापेक्षा दुसरा चांगला राजा हवा.

तेव्हा त्यांनी देवाची प्रार्थना करून दुसरा चांगला राजा पाठवण्याची विनंती केली. देवाने एक बगळा पाठविला. त्याने बेडकांना मारून खायला सुरुवात केली. म्हणून बेडकांनी देवाकडे अजून चांगल्या राजाची मागणी केली.

ते ऐकून देव म्हणाला, 'मी तुम्हांला पहिला राजा पाठवला होता तो तुम्हांला आवडला नाही. आता तुमचं कर्म तुम्हीच भोगा.'

तात्पर्य- देवाने ज्या स्थितीत ठेवले आहे त्यात समाधानी असावे

छत्रपती स्वराज्याची संकल्पना ही केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून अखिल भारतीय पातळीवर उभारण्याचा दूरदर्शी विचार होता, असे अनेक समकालीन व नंतरच्या इतिहासकारांनी नोंदवले आहे.

# अमर्याद महत्त्वाकांक्षेचे आभाळ पेलणारा राजा

छत्रपती शिवाजी महाराज यांनी "अहद पेशावर ते तहद तंजावर" असा विस्तार डोळ्यासमोर ठेवून स्वराज्याचा पाया घातला. त्यामुळे त्यांना केवळ राज्यसंस्थापक नव्हे तर राष्ट्रनिर्माते मानले जाते.

ब्रिटिश अभ्यासक प्रिन्स ऑफ वेल्स, इतिहासकार सर जदुनाथ सरकार तसेच डॉ. बाळकृष्ण यांनीही शिवाजी महाराजांची दृष्टी "आसेतू हिमाचल" भारत व्यापणारी असल्याचे नमूद केले आहे. डॉ. बाळकृष्ण यांच्या Shivaji the Great या ग्रंथात महाराजांनी सामान्य, भीरू जनतेला प्रेरणा देऊन धाडसी सैनिक, मुत्सद्दी व सेनानी घडवले, असे वर्णन आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे समाजात विलक्षण परिवर्तन झाले आणि मोगलांशी तुल्यबळ लढणारी शक्ती निर्माण झाली.

महाराजांचे निष्कलंक चारित्र्य हेही स्वराज्य विस्ताराचे मोठे कारण होते. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी फ्रान्सिस



मार्टिन याने शिवाजी महाराजांचा "धवल स्वभाव" हा त्यांचा सर्वोच्च गुण असल्याची नोंद केली आहे. तसेच फ्रेंच प्रवासी अबे कॅरे यांनी आपल्या The Travels of the Abbe Carré in India and the Near East 1672 to 1674 या ग्रंथात चौल येथे भेटलेल्या मराठी अधिकाऱ्याकडून ऐकलेल्या माहितीत महाराजांचा सिंधूपासून गंगेपर्यंत प्रदेश जिंकण्याचा मानस होता, असे लिहिले आहे. महाराजांना किल्ले, भूगोल आणि प्रदेशांचे अचूक ज्ञान होते, असेही त्याने नमूद केले. स्वराज्य विस्ताराची प्रेरणा पुढील पिढीतही टिकून राहिली. राजाराम महाराज यांच्या ४ जून १६९१ च्या पत्रात दिल्ली जिंकण्याची स्पष्ट योजना दिसते. हे पत्र इतिहास संशोधक त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी विशेष महत्त्वाचे मानले आहे. त्या वेळी सम्राट औरंगजेब सत्तेच्या शिखरावर असतानाही राजाराम महाराजांना राणी ताराबाई यांच्यासह जिंजी येथे आश्रय घ्यावा लागला होता; तरीही मराठे दिल्ली जिंकण्याची योजना आखत होते. या सर्व पुराव्यांवरून स्पष्ट होते की शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे केवळ प्रादेशिक सत्ता नव्हे, तर राष्ट्रीय स्वातंत्र्याची व्यापक आणि दीर्घकालीन कल्पना होती; आणि संकटातही मराठ्यांनी ती परंपरा जपली.

## ।। अभंगवाणी ।।



क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट ।
साधिलें अवीट निजसुख ॥१॥

सांडी मांडी मागें केल्या भरोवरी ।
अधिकचि परी दुःखाचिया ॥२॥

- संत तुकाराम


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दोन्ही राष्ट्रवादीत शाब्दिक चकमक!

## आमदार रोहित पवारांच्या दाव्याची छगन भुजबळांनी उडवली खिल्ली

**महाईन्यूज । पुणे**

**अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाबाबत राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू आहेत. दोन्ही राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून विलीनीकरणाबाबत वेगवेगळ्या भूमिका मांडल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एक मोठा दावा केला होता.**







खासदार डॉ.अमोल कोल्हे संयुक्त राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष झाले असते असं रोहित पवारांनी पत्रकार परिषदेत म्हटलं होतं. त्यांच्या या वक्तव्यामुळे चर्चांना उधाण आलं. आता रोहित पवारांनी केलेल्या या दाव्याची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी खिल्ली उडवली आहे. 'विलीनीकरण झालं नाही आणि कोण कोणत्या पदावर बसणार हे ठरवून टाकलं. मग उपमुख्यमंत्रीही ठरवला असेल, पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्षही ठरवला असेल', असा खोचक टोला छगन भुजबळांनी रोहित पवार यांना लगावला आहे.

### छगन भुजबळ काय म्हणाले?

"आता हे सगळे वेगवेगळे दावे करत आहेत, त्यांच्याबरोबर (शरद पवार गटातील नेते) अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचं ठरवलं होतं असं ते म्हणतात. मात्र, अजित पवार यांनी आम्हाला काही सांगितलंच नाही. मात्र, दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण झालं सुद्धा नाही, त्याआधीच कोण कुठल्या पदावर बसणार हे देखील ठरवून टाकलं होतं. मग त्यामध्ये उपमुख्यमंत्री कोण असेल? हे देखील ठरलं असेल. पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार? हे देखील ठरलं असेल. आता कोणी काहीही म्हणत असलं तरी आपण त्यावर काय बोलणार?", असं म्हणत छगन भुजबळ यांनी रोहित पवारांच्या वक्तव्याची खिल्ली उडवली.

### रोहित पवारांनी काय दावा केला?

"संयुक्तिक राष्ट्रवादीचे डॉ.अमोल कोल्हे प्रदेशाध्यक्ष झाले असते. अशी दादांची इच्छा होती. त्यामुळे अमोल कोल्हे प्रामाणिकपणे पुढाकार घेत होते. याबाबत अमोल कोल्हे, सुप्रिया सुळे, शशिकांत शिंदेंनी सांगितलंय. दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाकरता जयंत पाटलांच्या घरी १३ बैठका झाल्या आहेत. पाहिजेतर सीसीटीव्ही फुटेज तपासा. जयंत पाटलांनीही याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे", असं रोहित पवारांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं होतं.

### अमोल कोल्हेंनी काय म्हटलं होतं?

"दोन्ही पक्षाच्या एकत्रिकरणाच्या चर्चा झाल्या होत्या, ही वस्तुस्थिती आहे. १६ मे रोजी मी अजित पवारांबरोबर प्रवास केला होता. बारामती ते पुणे असा हा प्रवास होता. तेव्हापासून मी या प्रक्रियेमध्ये आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याची प्रचारसभा संपवून आम्ही हा प्रवास केला होता. तसेच दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाकरता १४ बैठका झाल्या होत्या, ११ वेळा जंयत पाटलांच्या घरी बैठका झाल्या होत्या. ही वस्तुस्थिती आहे", असं अमोल कोल्हे यांनी म्हटलं.

# अमृता फडणवीसांनी 'ॲक्सिस बँके'तील नोकरीचा दिला राजीनामा!

**महाईन्यूज । मुंबई**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी ॲक्सिस बँकेतील नोकरीचा राजीनामा दिला आहे. या संदर्भातील माहिती अमृता फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर (ट्विटर) पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे.**





अमृता फडणवीस यांनी जवळपास २३ वर्षे बँकिंग क्षेत्रात काम केलं आहे. २३ वर्षे बँकिंग क्षेत्रात काम केल्यानंतर आज अमृता फडणवीस यांनी त्यांच्या नोकरीचा स्वेच्छेने राजीनामा दिला असल्याचं त्यांनीच एक्सवरील (ट्विटर) पोस्टमध्ये स्पष्ट केलं आहे.

**अमृता फडणवीस यांनी पोस्टमध्ये काय म्हटलं?**

"मी २३ वर्षांपूर्वी एक व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी म्हणून ॲक्सिस बँकेत रुजू झाले होते. पण आज मी वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून माझ्या पदाचा राजीनामा देत आहे. यावेळी माझं हृदय कृतज्ञतेनं भरून आलं आहे. शाखा कामकाजापासून ते कॉर्पोरेट बँकिंग आणि ट्रेझरी ते ग्राहक संबंधांपर्यंतच्या अनुभवामुळे ही संस्था माझ्यासाठी कुटुंब, शिक्षक आणि दुसरं घर राहिली. बँकेतील माझे सर्व सहकारी आणि वरिष्ठ, विशेषतः एमडी आणि सीईओ अमिताभ चौधरी यांच्या पाठिंब्याबद्दल मी आभारी आहे. हा सुंदर अध्याय येथे संपत असताना मी आयुष्यभराचे धडे आणि मैत्री घेऊन जात आहे. धन्यवाद, ॲक्सिस बँक", असं अमृता फडणवीस यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

### कोण आहेत अमृता फडणवीस?

दरम्यान, अमृता फडणवीस या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी आहेत. तसेच अमृता फडणवीस या सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असतात. त्यांच्या ट्विटर, इन्स्टाग्राम पोस्टवर मोठ्या प्रमाणावर लाईक, कमेंट्सचा पाऊस पडत असतो. त्यांना फॉलो करणारा वर्गही मोठा आहे. अमृता फडणवीसांची सामाजिक जीवनातली कोणतीही कृती ही चर्चेचा विषय ठरते. तसेच अमृता फडणवीस यांना गाण्याची प्रचंड आवड असून त्या उत्तम गायिका आहेत.

# ब्रिटनचे माजी प्रिन्स अँड्र्यू यांना अटक!

## एपस्टीन फाईल्समध्ये नाव, यापूर्वीच राजघराण्यातून हकालपट्टी

महाईन्यूज । ब्रिटन

**ब्रिटनच्या राजघराण्याला अनेक वर्षांचा इतिहास आहे. ब्रिटनच्या राजघराण्याकडे जगातील सर्वात श्रीमंत आणि लोकप्रिय राजघराणं म्हणून पाहिलं जातं. पण मागील काही महिन्यांपासून या राजघराण्यात मोठ्या घडामोडी घडत आहेत. काही महिन्यांपूर्वी ब्रिटनच्या राजघराण्यातील वाद अक्षरशः चव्हाट्यावर आला होता.**



त्यानंतर आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. ब्रिटनचे माजी प्रिन्स अँड्र्यू यांना आज यूके पोलिसांनी अटक केल्याची माहिती समोर आली आहे. माजी प्रिन्स अँड्र्यू यांनी सार्वजनिक पदावर असताना गैरवर्तन केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला असून या प्रकरणी यूके पोलिसांनी ही कारवाई केली आहे. या संदर्भातील वृत्त रॉयटर्सच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

वृत्तानुसार, माजी प्रिन्स अँड्र्यू यांना आज सकाळी ८ वाजता त्यांच्या घरातून अटक करण्यात आली. त्यांच्या अटकेवेळी यूके पोलीस साध्या वेशात आले होते. आता पुढील चौकशी केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान, अमेरिकन प्रशासनाने जाहीर केलेल्या जेफ्री एपस्टीन फाईल्समध्येही माजी प्रिन्स अँड्र्यू यांचं नाव आल्याचे आरोप करण्यात आलेले आहेत. त्यामुळे आता माजी प्रिन्स अँड्र्यू यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

### अँड्र्यू आता राजकुमार राहिले नाही

"प्रिन्स अँड्र्यू हे आता फक्त अँड्र्यू माउंटबॅटन विंडसर म्हणून ओळखले जातील, म्हणजे ते आता राजकुमार राहिले नाहीत. तसेच ते आता त्यांच्या पर्यायी खासगी निवासस्थानात जातील आणि त्यांना त्या ठिकाणी त्यांना कायदेशीर संरक्षण दिलं जाईल", असं निवेदनात म्हटलं होतं.

### अँड्र्यू यांची राजघराण्यातून हकालपट्टी



ब्रिटनचे राजा चार्ल्स तिसरे यांचे भाऊ प्रिन्स अँड्र्यू यांची काही महिन्यांपूर्वी राजघराण्यातून हकालपट्टी करण्यात आली होती. अँड्र्यू यांच्याकडून त्यांच्या पदव्या काढून घेण्यात आल्या होत्या. तसेच ब्रिटनमधील बकिंगहॅम पॅलेसमधून प्रिन्स अँड्र्यू यांना बाहेर काढण्यात आलं होतं. बकिंगहॅम पॅलेसने या संदर्भात एक निवेदन जारी केलं होतं. त्या निवेदनात म्हटलं होतं की, "ब्रिटनचे राजा चार्ल्स तिसरे यांचे भाऊ प्रिन्स अँड्र्यू यांच्या उर्वरित सर्व पदव्या काढून घेण्यात येत आहेत आणि त्यांना राजघराण्यातून बेदखल करण्यात येत आहे. तसेच ब्रिटनचे राजा चार्ल्स तिसरे यांनी प्रिन्स अँड्र्यू यांच्या सर्व पदव्या आणि त्यांचा सन्मान काढून टाकण्याच्या संदर्भातील सर्व औपचारिक प्रक्रिया पूर्ण केली आहे", असं बकिंगहॅम पॅलेसच्या निवेदनात म्हटलं होतं.

---

# घराशेजारी राहणाऱ्या मौलानाचा १४ वर्षीय मुलीवर बलात्कार

महाईन्यूज । उत्तर प्रदेश

**उत्तर प्रदेशमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. घराशेजारी राहणाऱ्या मौलानाने १४ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली. मुलीने बाळाला जन्म दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. मुलीच्या कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर 'मौलाना इस्लाम' या संशयिताला अटक करण्यात आली आहे. मौलानाने धमकावून मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप पालकांकडून करण्यात आला आहे.**





पीलखुवा कोतवाली परिसरात ही घटना घडली असल्याची माहिती आहे. १४ फेब्रुवारी रोजी येथील १४ वर्षीय मुलीच्या पोटात दुखत असल्याने घरच्यांनी तिला रुग्णालयात नेले. तपासणीनंतर मुलगी गरोदर असल्याचे समोर आले.

कुटुंबीय मुलीला घरी घेऊन आल्यानंतर काही वेळातच तिने बाळाला जन्म दिला, यानंतर पीडितेने घडलेल्या प्रकाराची माहिती कुटुंबीयांना दिली.

### तक्रारीनंतर मौलानाला अटक

तक्रारीत नमूद करण्यात आलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीला देखील ती गरोदर असल्याची माहिती नव्हती. पोटात दुखायला लागल्यानंतर दवाखान्यातूनच याबाबत माहिती समजली. नंतर मुलीने घरातच बाळाला जन्म दिला. यानंतर पीडितेच्या कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर संशयित मौलाना इस्लाम याला अटक करण्यात आली.


### रोजगारासाठी स्थलांतर

पीडितेचे कुटुंबीय मूळचे अमरोही जिल्ह्यातील रहिवासी असून, रोजगारासाठी पीलखुवा कोतवाली भागात राहतात. पीडितेचे आई- वडील मजुरी करतात. शेजारी राहणारा मौलाना सातत्याने त्रास देऊन लैंगिक छळ करत होता, असे पीडितेने पोलिसांनी सांगितले आहे. पोलिसांनी संशयिताला अटक केली असून, मुलीला वन स्टॉप केंद्रात पाठविण्यात आले आहे.



# मृणाल ठाकूरने सांगितला 'त्या' बॉयफ्रेंडचा अजब किस्सा

अभिनेत्री मृणाल ठाकूर आणि धनुष यांच्या लग्नाच्या अफवा सोशल मीडियावर पसरल्या होत्या. याच दरम्यान, मृणालने तिच्या आगामी 'दो दिवाने शहर में' या चित्रपटाच्या प्रमोशनवेळी नात्यांमधील इनसिक्युरिटी म्हणजेच असुरक्षितता या विषयावर तिने तिचं मत व्यक्त केलं. तसेच मृणालने तिच्या एका जुन्या नात्यातील मजेशीर पण गंभीर किस्सा सांगितला. मृणाल हृतिक रोशनबरोबर 'सुपर ३०' चित्रपटाचे शूटिंग करत होती, तेव्हा ती रिलेशनशिपमध्ये होती. तिचा बॉयफ्रेंड परदेशी होता, तो इनसिक्योर झाला होता. रौनक रजनीच्या युट्यूब चॅनेलवर बोलताना मृणाल म्हणाली, "त्याला वाटलं की मी हृतिक रोशनसारख्या खूप देखण्या हिरोबरोबर काम करतेय आणि त्याच्याबरोबर वेळ घालवतेय. त्यामुळे त्याने स्वतःहून वर्कआऊट सुरू केले आणि चक्क १५-१७ किलो वजन कमी करून बॉडी बनवली. नंतर काही काळाने त्याने व्यायाम करणं सोडून दिलं. तो खूप खाऊ लागला आणि त्याचं वजन २० किलोने वाढलं. जेव्हा मी त्याला विचारलं की हे काय सुरू आहे? तेव्हा तो म्हणाला, 'मी त्याच्यासारखं दिसण्यासाठी हे सगळं करून आता थकलो आहे.'" मृणाल ठाकूर पुढे म्हणाली, "मी त्याला कधीच वजन कमी करायला सांगितले नव्हतं, पण हृतिकसारख्या देखण्या हिरोबरोबर काम करतेय, या विचाराने त्याच्या मनात असुरक्षितता निर्माण झाली होती." दरम्यान, मृणालने तिच्याबद्दल अलीकडेच पसरलेल्या अफवांवर प्रतिक्रिया दिली. मृणालचं नाव दाक्षिणात्य अभिनेता धनुषशी जोडलं गेलं. इतकंच नाही तर तिच्या व धनुषच्या लग्नाचा दावा करणारा एक व्हिडीओही व्हायरल झाला होता. या व्हिडीओत बरेच सेलिब्रिटी असल्याचंही दाखवण्यात आलं होतं. हे सगळं भयंकर असल्याचं मृणालने म्हटलं. 'गलाट्टा प्लस'शी बोलताना मृणाल म्हणाली, "मला वाटतं १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाईन डे असतो, तो आता १ एप्रिल म्हणजे एप्रिल फूल डे झाला आहे. कारण हे कोणी सुरू केलं मला माहित नाही. माझ्या नावाने काही खोट्या गोष्टी छापल्या जात आहेत, ज्याबद्दल मी कधीच बोलले नाही." गेल्या महिन्यात मृणाल आणि धनुष यांचे लग्न झाल्याचा एक AI निर्मित व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. त्याबद्दल ती म्हणाली, "हे खूप भीतीदायक आहे. फक्त व्ह्यूज मिळवण्यासाठी लोक अशा गोष्टी करत आहेत." धनुषने मृणालच्या सन ऑफ सरदार २ च्या स्क्रीनिंगला हजेरी लावली होती, तेव्हापासून तिच्या व धनुषबद्दल या अफवा पसरल्या होत्या.



# हॉलिवूडमध्ये अभिनेत्रींना वाईट वागणूक

लोकप्रिय हॉलिवूड अभिनेत्री आणि दिग्दर्शिका क्रिस्टन स्टीवर्टने हॉलिवूडवरून धक्कादायक खुलासा केला आहे. हॉलिवूडमध्ये अभिनेत्रींसोबत हातच्या बाहुल्यांप्रमाणे वर्तन केले जाते असे तिने सांगितले आहे. क्रिस्टन सध्या स्वत:चा चित्रपट 'द क्रोनोलॉजी ऑफ वॉटर'मुळे चर्चेत असून याचे दिग्दर्शन तिनेच केले आहे. अभिनेत्रींना अत्यंत वाईटप्रकारे वागविले जाते. कुणीही अभिनेत्री होऊ शकते असे लोकांचे मानणे असते, परंतु जेव्हा मी पहिल्यांदा दिग्दर्शिका म्हणून स्वत:च्या चित्रपटाविषयी बोलण्यासाठी त्यांची भेट घेतली, तेव्हा आलेला अनुभव अत्यंत वेगळा होता असे तिने सांगितले आहे. दिग्दर्शकाकडे अलौकिक क्षमता असते, खूप अधिकार असतात अशी धारणा आहे, परंतु हे सत्य नाही. ही धारणा पुरुषांद्वारे फैलावण्यात आलेली आहे. मी सदैव तक्रार करत राहते असे दाखवू इच्छित नाही, परंतु अभिनेत्रींसाठी स्थिती अभिनेत्यांपेक्षा खराब आहे. अभिनेत्रींना हातच्या बाहुल्यांप्रमाणे वागविले जात असते असा दावा तिने केला. क्रिस्टन ही 'ट्वाइलाइट' चित्रपटांमुळे चर्चेत आली होती. आता ती स्वत:चा चित्रपट 'द क्रोनोलॉजी ऑफ वॉटर'मुळे चर्चेत आहे. तिच्या या चित्रपटाला कान फिल्म फेस्टिव्हलमध्ये 6 मिनिटांचे स्टँडिंग ओवेशनही मिळाले होते. क्रिस्टन या चित्रपटावर मागील 8 वर्षांपासून काम करत होती. क्रिस्टनची गणना जगातील सर्वाधिक मानधन स्वीकारणाऱ्या अभिनेत्रींमध्ये होते. तिने एक ऑस्कर आणि सीझर अवॉर्ड पटकाविलेला आहे. क्रिस्टन सध्या स्वत:चा चित्रपट 'द क्रोनोलॉजी ऑफ वॉटर'मुळे चर्चेत आहे. सध्या 35 वर्षांची असलेल्या क्रिस्टनने स्वत:च्या अभिनयाची कारकीर्द वयाच्या 12 व्या वर्षी सुरू केली होती.



# ऋचा चड्ढाचा धक्कादायक अनुभव

बॉलिवूड अभिनेत्री ऋचा चड्ढा हिने तिच्या करिअरच्या सुरुवातीला आलेल्या एका कडू अनुभवाबद्दल नुकताच खुलासा केला आहे. आज यशस्वी अभिनेत्री म्हणून ओळख असली तरी सुरुवातीच्या काळात तिला एका अतिशय जवळच्या व्यक्तीकडून धोका मिळाला होता. त्या घटनेमुळे तिचा विश्वास तुटला, पण त्याच वेळी आयुष्यातील मोठा धडा तिला मिळाला. ऋचाने एका मुलाखतीत कोणाचेही नाव न घेता हा अनुभव सांगितला. ती म्हणाली की, "करिअरच्या सुरुवातीला मला कळलं की प्रत्येकजण तुमचं भलं इच्छितो असं नसतं. मी खूप भोळी होते. काही लोकांना तुमच्या यशाची भीती वाटते. त्यांना वाटतं तुम्ही त्यांच्या पुढे जाल किंवा त्यांची स्पॉटलाइट घेऊन जाल." तिच्या मते, जेव्हा एखादी व्यक्ती करिअरच्या सुरुवातीला असते, तेव्हा ती अनेक गोष्टींबाबत नादान असते. अशा वेळी चुकीच्या लोकांवर विश्वास ठेवला जातो. ऋचाने सांगितले की, ज्या व्यक्तीवर ती पूर्ण विश्वास ठेवत होती, त्याच व्यक्तीने तिचा गैरफायदा घेतला. हा अनुभव तिच्यासाठी धक्कादायक होता, पण त्यातूनच तिने स्वतःला अधिक मजबूत बनवले. आज ऋचा चड्ढा आपल्या दमदार अभिनयामुळे इंडस्ट्रीत वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. तिने अनेक वेगळ्या आणि आशयघन भूमिका साकारल्या आहेत. त्यामुळेच ती नेहमीच स्पष्टवक्तेपणासाठी आणि धाडसी भूमिकांसाठी ओळखली जाते. दरम्यान, ऋचा अलीकडेच एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली होती.



# टी20 वर्ल्डकप मधून १२ संघ बाहेर

## प्रत्येक संघाला ICCकडून मिळाले कोट्यवधी रूपये; ऑस्ट्रेलियाचाही समावेश

**महाईन्यूज । मुंबई**

**टी-२० विश्वचषक २०२६ मधील गट टप्प्यातील अखेरचे सामने खेळवले जात आहेत. सुपर-८ फेरीसाठीचे आठ संघांची नावेही निश्चित करण्यात आली आहेत. उर्वरित १२ संघ त्यांचे गट टप्प्यातील सामने पूर्ण केल्यानंतर स्पर्धेतून बाहेर होणार आहेत. एकूण २० संघांमध्ये टी-२० विश्वचषक स्पर्धा खेळवली गेली. पण बाहेर पडलेल्या संघांसाठीही आयसीसीने बक्षिसाची रक्कम ठेवली आहे.**




आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत कसोटी खेळणारे संघ आणि त्याशिवाय असोसिएट संघांनाही संधी देण्यात आली आहे. आयसीसीने स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आणि विजेत्या संघाबरोबरच स्पर्धेतून लवकर बाहेर पडणाऱ्या संघांनाही बक्षिसाची रक्कम ठेवली आहे. जेणेकरून असोसिएट संघदेखील आर्थिकरित्या मजबूत राहतील.

टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत पहिल्या फेरीतून आधीच बाहेर पडलेल्या संघांमध्ये अमेरिका, नामिबिया, नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, आयर्लंड, ओमान, इटली, नेपाळ, स्कॉटलंड, अफगाणिस्तान, कॅनडा आणि यूएई यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने स्पर्धेत पाचव्या ते बाराव्या स्थानावर राहिलेल्या प्रत्येक संघाला ३,८०,००० अमेरिकी डॉलर्स ३ कोटी ४८ लाख इतकी बक्षीस रक्कम मिळणार आहे. तसेच स्पर्धेत तेराव्या ते शेवटच्या स्थानांवर राहिलेल्या प्रत्येक संघाला २,५०,००० अमेरिकी डॉलर्स सुमारे २ कोटी २८ लाख इतकी रक्कम देण्यात येणार आहे.

याशिवाय, टी२० विश्वचषकात प्रत्येक सामना जिंकण्यासाठी आयसीसी अतिरिक्त निधी देखील देते. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक संघाला २.२८ कोटी मिळण्याची शक्यता आहे. तर अंदाजानुसार विजेत्या संघाला २७-२८ कोटी दिले जातील. तर उपविजेत्या संघाला १४ ते १५ कोटी बक्षिसाची रक्कम मिळू शकते. तर सेमीफायनलमध्ये पराभूत संघांना ७ते ८ कोटी मिळण्याची शक्यता आहे.

टी-२० विश्वचषक २०२६ मधील सुपर-८चे सामने २१ फेब्रुवारीपासून खेळवले जातील. त्यानंतर ४ मार्च व ५ मार्चला सेमीफायनलचे सामने खेळवले जातील. तर ८ मार्चला स्पर्धेतील अंतिम सामना अहमदाबादमध्ये खेळवला जाईल.

# गावस्करांनी अभिषेकला झापलं, Super 8 पूर्वी टोचले कान

**महाईन्यूज । मुंबई**

**टी-20 चा नंबर वन फलंदाज अभिषेक शर्मा सलग तीन सामन्यात शून्य धावांवर बाद झाला आहे, ज्यामुळे भारतीय संघ तणावात आहे. भारताने आता सुपर 8 मध्ये प्रवेशही केला आहे. आता दिवसेंदिवस स्पर्धा अधिक कठीण होताना दिसेल. अशा परिस्थितीत भारताचा संपूर्ण संघ फॉर्ममध्ये असणं गरजेचा आहे. अभिषेक शर्मा सतत फ्लॉप होत असल्याने आता माजी दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी आता अभिषेक शर्मा एक गुरुमंत्र दिला आहे.**






गावस्कर म्हणाले, "त्याला स्मार्ट क्रिकेट खेळावे लागेल, त्याला त्याच्या पायांमध्ये ब्लड सर्कुलेशन नीट करावे लागेल. सर्वकाही व्यवस्थित होईल. तो ज्या पद्धतीने बाहेर पडतो आहे ते खूपच अंदाजे आहे. मानसिकता अशी आहे की, मला 200 स्ट्राईक रेट मारणारा माणूस म्हणून पाहिले जाते, मला त्याप्रमाणे जगावे लागेल. तुम्हाला ते करण्याची गरज नाही. ते अगदी नैसर्गिक आहे. जेव्हा तुम्ही काही एकेरी धावा करता तेव्हा तुम्हाला खेळपट्टीची जाणीव होते. एकदा तो सेट झाला की तो मोठा धावा करेल."

### गावस्कर काय म्हणाले?

माजी क्रिकेट दिग्गज सुनील गावस्कर यांनी आता अभिषेकच्या सातत्याने बाद होण्यावर प्रतिक्रिया दिली आहे. गावस्कर यांनी अभिषेक शर्माला या कठीण काळातून बाहेर पडण्याचा मंत्र दिला आहे. स्टार स्पोर्ट्सवर बोलताना गावस्कर अभिषेकबद्दल म्हणाले, "कदाचित त्याच्यावर अपेक्षा थोड्या जास्त आहेत. जर त्याने पहिल्या सामन्यात चांगली सुरुवात केली असती तर परिस्थिती वेगळी असती. तुम्हाला असे वाटू शकते की मोठा खेळाडू, षटकार मारणारा आणि संघातील नंबर वन फलंदाज होण्याच्या अपेक्षा त्याच्यावर जास्त आहेत."

### गावस्करांनी दिला गुरुमंत्र

माजी कर्णधार गावस्कर पुढे म्हणाले, "मला वाटते की, त्याच्याकडे असलेल्या विविध प्रकारच्या फटक्यांना पाहता, त्याला मध्यभागी स्वतःला थोडा जास्त वेळ देण्याची गरज आहे. त्याला त्याच्या डावाची सुरुवात चौकार किंवा षटकाराने करावी लागत नाही. जर तो असे करत असेल तर ते ठीक आहे, परंतु त्याला मोठा शॉट मारण्यासाठी रेषेच्या पलीकडे खेळण्याची गरज नाही. जरी चार डॉट बॉल असले तरी काही फरक पडत नाही कारण तो पुढील चार ते आठ चेंडूंमध्ये त्याची भरपाई करू शकतो. स्मार्ट क्रिकेट खेळण्याचा आणि कोणत्याही पूर्वकल्पित अपेक्षा पूर्ण करू नये" असा सल्ला दिला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 20 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# श्री नागेश्वर महाराज कुस्ती आखाडा दिमाखात

## हरियाणाचा पै. साहिल कोहली ठरला श्री नागेश्वर महाराज केसरी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी गावचे ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज भंडारा यात्रा उत्सवाच्या निमित्ताने आयोजित भव्य, जंगी आणि जल्लोषपूर्ण मैदानी कुस्ती आखाडा मोठ्या उत्साहात पार पडला. श्री नागेश्वर महाराज व इतर देवदेवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित या बेमुदत कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्रासह देशभरातील नामांकित पैलवानांनी सहभाग घेतला. पारंपरिक कुस्तीच्या शौर्यपूर्ण लढतींनी कुस्तीप्रेमींना थरारक क्षणांची अनुभूती दिली.**



> मोशी गावातील श्री नागेश्वर महाराज भंडारा यात्रा आणि त्याअंतर्गत होणारा हा भव्य कुस्ती आखाडा ही आपल्या ग्रामीण क्रीडा परंपरेची खरी ओळख आहे. तरुण पैलवानांमध्ये प्रचंड गुणवत्ता असून मोशी ग्रामस्थांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भंडारा उत्सवाच्या निमित्ताने कुस्ती परंपरा कायम ठेवली आहे. मोशीचा हा आखाडा महाराष्ट्रातच नव्हे तर देशात नावारूपाला येईल, असा मला पूर्ण विश्वास आहे.
>
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

मुख्य लढतीत पै. माऊली कोकाटे विरुद्ध हरियाणाचा पै. साहिल कोहली यांच्यात गुणांवर आधारित अटीतटीची झुंज रंगली. या चुरशीच्या सामन्यात साहिल कोहली यांनी विजय मिळवत 'श्री नागेश्वर महाराज केसरी 2026' ची मानाची गदा पटकावली.

तसेच पै. रविराज चव्हाण विरुद्ध दिल्लीचा पै. रजत मंडोली यांच्यातील तुफानी सामन्यात रविराज चव्हाण यांना दुखापत झाल्याने कुस्ती बरोबरीत सोडण्यात आली.

तरीही दोन्ही पैलवानांच्या जिद्दीने आणि खेळभावनेने उपस्थितांची मने जिंकली.

हा भव्य कुस्ती आखाडा श्री नागेश्वर महाराज भंडारा मैदान आमराई येथे आयोजित करण्यात आला होता. मोशी व परिसरातील हजारो कुस्तीप्रेमींनी उपस्थिती लावत आखाड्याला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. अत्यंत सुनियोजित व्यवस्थेमुळे आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे हा सोहळा यशस्वीरीत्या पार पडला.



यावेळी आमदार महेश लांडगे, ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेते, ट्रिपल महाराष्ट्र केसरी नरसिंग यादव यांच्यासह अनेक नामांकित पैलवान व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे यांनी काही काळ पंच म्हणून सेवा बजावत पाहून आखाड्याची रंगत आणखी वाढवली. अशारितीने मोशीमध्ये श्री नागेश्वर महाराज कुस्ती आखाडा रंगला.

# 'ट्रॅफिक बडी'मुळे बेशिस्त वाहनचालकांवर "अंकुश"

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील रस्त्यांवर वाहतूक पोलिस नसले तरी बेशिस्त वाहनचालकांना आता मोकळे रान मिळणार नाही. सजग नागरिक थेट व्हॉट्सॲपद्वारे वाहतूक नियमभंगाची तक्रार पोलिसांकडे करू शकतात. पिंपरी-चिंचवड पोलिस यांच्या वाहतूक शाखेने सुरू केलेल्या 'ट्राफिक बडी' या व्हॉट्सॲप चॅटबॉट प्रणालीमुळे हे शक्य झाले आहे. आतापर्यंत या प्रणालीवर एकूण ९ हजार ८७२ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.**



### कोणत्या तक्रारी करता येतात?

वाहतूक कोंडी, सिग्नल तोडणे, हेल्मेट न घालणे, अवैध पार्किंग, रस्त्यावरचे अडथळे तसेच सुरक्षा-संबंधित मुद्द्यांबाबत तक्रार नोंदविता येते. मात्र गुन्हेगारी किंवा इतर स्वरूपाच्या तक्रारी या प्रणालीत स्वीकारल्या जात नाहीत.

### खोट्या तक्रारींना आळा

'ट्राफिक बडी' ही लोकेशन-बेस्ड प्रणाली असल्याने तक्रारदाराच्या ठिकाणाची पडताळणी होते. त्यामुळे खोट्या तक्रारी टाळण्यास मदत होते. लोकेशन किंवा पुरावा उपलब्ध नसल्यास तक्रार नामंजूर होते.

१७ जुलै २०२५ रोजी सुरू झालेली ही सुविधा आता पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. नागरिकांनी ८७८८६४९८८५ या क्रमांकावर 'हाय' किंवा 'हॅलो' असा संदेश पाठविल्यानंतर चॅटबॉट विविध पर्याय उपलब्ध करून देतो. तक्रार नोंदविताना फोटो, व्हिडीओ आणि लोकेशन शेअर करणे आवश्यक आहे. तक्रारीनंतर संबंधित आयडी देण्यात येतो आणि कारवाईबाबत अद्ययावत माहिती पाठवली जाते.

### रस्त्यांच्या तक्रारी महापालिकेकडे वर्ग

खड्डे, खराब रस्ते किंवा दुरुस्ती-संबंधित तक्रारी 'ट्राफिक बडी'द्वारे स्वीकारून त्या पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्याकडे वर्ग केल्या जातात. पोलिस आणि महापालिका यांच्यात समन्वय साधून आवश्यक ती दुरुस्ती केली जाते. समस्या न सुटल्यास मासिक आढावा घेतला जातो. रस्त्यांबाबत आतापर्यंत ३२० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणारी ही राज्यातील पहिली स्थान-आधारित योजना असल्याचे वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त विवेक पाटील यांनी सांगितले. सजग नागरिक थेट व्हॉट्सॲपद्वारे वाहतूक नियमभंगाची तक्रार पोलिसांकडे करू शकतात. पिंपरी-चिंचवड पोलिस यांच्या वाहतूक शाखेने सुरू केलेल्या 'ट्राफिक बडी' या व्हॉट्सॲप चॅटबॉट प्रणालीमुळे हे शक्य झाले आहे. नागरिकांनी या सुविधेचा सक्रिय वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

> 'ट्राफिक बडी' ही केवळ तक्रार नोंदविण्याची सुविधा नसून नागरिक आणि वाहतूक पोलिस यांच्यातील थेट दुवा आहे. स्थान-आधारित प्रणालीमुळे खोट्या तक्रारींना आळा बसतो आणि प्रत्यक्ष घटनास्थळी झालेल्या नियमभंगावर तत्काळ कारवाई करता येते. नागरिकांनी सजग राहून फोटो, व्हिडीओ आणि अचूक लोकेशनसह तक्रारी नोंदविल्यास शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध आणि सुरक्षित होण्यास निश्चितच मदत होईल.
>
> - **श्री. विवेक पाटील,** पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग.

# पुणे मार्गिकेवर पहाटेपासून ट्राफिक जॅम!

## टाटा कॅम्प ते अमृतांजन पुलापर्यंत वाहनांच्या रांगा ; लाँग विकेंडमुळे वाढली गर्दी

**महाईन्यूज । लोणावळा**

**मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर गुरुवारी पहाटेपासून पुन्हा एकदा भीषण वाहतूक कोंडी झालीय. बोरघाट परिसरात आज पहाटेपासून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या अवजड वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. यामुळे एक्सप्रेवेवर वाहतूक संथ गतीने सुरू आहे. सकाळपासून पुण्याच्या दिशेने टाटा कॅम्प ते अमृतांजन पॉईंट पुढे सुमारे दोन ते तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.**





पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या अधिक असल्याने बोरघाट वाहतूक पोलिसांकडून 'ब्लॉक' घेण्यात येत आहे. मुंबईकडे जाणारी वाहतूक खंडाळा बोगदा येथे तर पुण्याकडे येणारी वाहतूक खोपोली हद्दीत बोरघाट पोलिस मदत केंद्राजवळ नियोजनबद्ध पद्धतीने वाहतूक थांबवून साचलेला बॅकलॉग टप्प्याटप्प्याने सोडण्यात येत आहे. मात्र तोपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र आहे.

पुण्याकडे येणाऱ्या ट्रक व कंटेनर आदी अवजड वाहनांची संख्या जास्त असल्याने घाट मार्गावर काही काळ वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे वाहतूक संथ गतीने सुरू असून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती महामार्ग वाहतूक पोलिसांच्या देण्यात आली.

### तीन ब्लॉक तरीही कोंडी...

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर दुपारी साडे बारा वाजेपर्यंत तीन वेळा ब्लॉक घेण्यात आला. मात्र तरीही पुण्याच्या दिशेनं वाहतूक कोंडी निर्माण झालीय. तर मुंबईच्या दिशेनं जाणारी वाहतूक सुरळीत आहे. शिवजयंती सुट्टी आणि त्यानंतर असलेला लाँग विकेंड यामुळे वाहनांची संख्या वाढलीय.

### प्रवशांमधून संताप...

ब्लॉक घेताना १५ मिनिटांसाठी वाहतूक थांबवली जाते आणि कोंडी झालेल्या मार्गावरील वाहने वळवण्यात येतात. मात्र अद्यापही पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी झालेली नाही. २ ते ३ किमी पेक्षा जास्त लांब वाहनांच्या रांगा लागल्यानं प्रवाशांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

# 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याचा दुसरा प्रयोग उत्साहात संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**'शिवगर्जना' महानाट्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेमागील उद्देश, लोकाभिमुख प्रशासन आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी केलेला संघर्ष प्रभावीपणे दाखविण्यात येत आहे. आजच्या काळात इतिहास केवळ लक्षात ठेवण्याचा विषय राहिलेला नाही, तर त्यातून प्रेरणा घेऊन सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज आहे.**



छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य उभे करताना न्याय, समता आणि कष्टकऱ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवले होते. हीच भूमिका आजच्या तरुणांनी स्वीकारली, तर समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. युवकांमध्ये राष्ट्राभिमान जागवण्याबरोबरच समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव निर्माण करण्याची ताकद या महानाट्याच्या सादरीकरणात आहे, असे प्रतिपादन थोर सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'विचार प्रबोधन पर्वा'अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याचा दुसरा प्रयोग बुधवारी १८ फेब्रुवारी रोजी निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसरात मोठ्या उत्साहात पार पडला. या महानाट्यास थोर सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित राहून संपूर्ण महानाट्य पाहिले, त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे, उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य अमित गावडे, नगरसदस्य मारुती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते प्रकाश जाधव,वैभव जाधव,संतोष सातपुते, आबासाहेब ढवळे, सतीश काळे, संतोष कवडे,श्रीमंत जगताप,नागनाथ म्हस्के, ज्ञानेश्वर लोभे, सचिन आल्हाट, संदीप निकम, कुणाल कांबळे, सचिन बोराडे, संदीप बोराडे, सागर तापकीर,जीवन बोराडे,स्वप्निल शिंदे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवगर्जना महानाट्याद्वारे ऐतिहासिक घटनांवर आधारित प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण, भव्य नेपथ्यरचना, पारंपरिक वेशभूषा आणि आधुनिक तांत्रिक साधनांच्या सहाय्याने उभारण्यात आलेल्या दृश्यांमुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. सादरीकरणादरम्यान अनेक प्रसंगांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद देत टाळ्यांचा कडकडाट या महानाट्यातून स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, किल्ल्यांच्या लढाया, आरमार उभारणी तसेच शिवकालीन प्रशासनव्यवस्थेचे विविध पैलू नाट्यमय पद्धतीने उलगडण्यात आले. कलाकारांच्या जिवंत अभिनयातून साकारलेल्या प्रसंगांमुळे इतिहासाचा थरार अनुभवण्याची संधी उपस्थितांना मिळाली.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने नागरिकांसाठी स्त्री,पुरूषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आवश्यक नागरी सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच वाहतूक नियोजन करण्यात आले होते.

### आकर्षक प्रकाशरेषा, रंगांची उधळण

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त निगडी येथील भक्ती शक्ती समुहशिल्प उद्यान येथे भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने रात्री भव्य फटाक्यांच्या आतषबाजीचे आयोजन करण्यात आले होते. आकर्षक प्रकाशरेषा, रंगांची उधळण आणि विविध आकाशदीपांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता. उपस्थित नागरिकांनी मोठ्या उत्साहात या आतषबाजीचा आनंद घेत जयंती सोहळ्याला जल्लोषमय वातावरणात साजरे केले. या नेत्रदीपक आतषबाजीमुळे परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

# भोसरीमध्ये शिवजयंतीचा उत्सव उत्साहात

## मास्टर माईंड ग्लोबल स्कूलची भव्य रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मास्टर माईंड ग्लोबल स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली. विविध उपक्रमांनी शाळा परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



यानंतर सकाळी साडेआठ वाजता शाळेपासून भोसरी चौकापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने ढोल-ताशांच्या तालावर सादर केलेल्या दमदार प्रदर्शनाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रॅलीदरम्यान शिस्तबद्ध संचलन आणि पारंपरिक वेशभूषेमुळे वातावरण अधिकच रंगतदार झाले.

सांस्कृतिक कार्यक्रमांत विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी नृत्याविष्कार सादर केले. स्वराज्य स्थापनेचा इतिहास, पराक्रम आणि दूरदृष्टी यांचे प्रभावी चित्रण या सादरीकरणांतून करण्यात आले. "विद्यार्थ्यांना शिवरायांचा इतिहास समजावा आणि त्यांच्यातील नेतृत्वगुण व देशप्रेमाची भावना विकसित व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे," असे शाळेच्या वतीने सांगण्यात आले. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. पोलिसांनी केलेल्या चोख बंदोबस्ताबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि प्रेरणा जागृत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना

मास्टर माईंड ग्लोबल स्कूल येथे साजरी करण्यात आलेली छत्रपती शिवाजी महाराज जयंती ही केवळ पारंपरिक उत्सवापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा भाग ठरली. रॅली, लेझीम, ढोल-ताशा आणि ऐतिहासिक नृत्याविष्कार यांच्या माध्यमातून इतिहासाचे प्रात्यक्षिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, शिस्त आणि सामाजिक जाणीव विकसित होण्यास मदत होते. तसेच, पोलीस प्रशासनाचा सत्कार करून समाजातील विविध घटकांप्रती कृतज्ञता आणि आदर व्यक्त करण्याचा संदेश देण्यात आला, जो मूल्याधिष्ठित शिक्षणाचा महत्त्वाचा भाग मानला जाऊ शकतो.

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिवजयंतीचा उत्साह

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत, न्यायप्रविष्ट आणि शिस्तप्रिय शासनकर्ते श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती 'न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव' येथे अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम आणि भव्य मिरवणुकीने संपूर्ण थेरगाव परिसर शिवमय झाला होता.**



### सांस्कृतिक कार्यक्रमातून दिली मानवंदना...

कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी पोवाडे, ऐतिहासिक नृत्य आणि ओघवत्या शैलीत भाषणे सादर करून शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला. पारंपारिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच्या जोरावर उपस्थितांची मने जिंकली. या निमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम आणि भव्य मिरवणुकीने संपूर्ण थेरगाव परिसर शिवमय झाला होता.

### भव्य पालखी सोहळा आणि मिरवणूक

शिवजयंतीचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे शिवरायांच्या मूर्तीची पालखी मिरवणूक. ढोल-ताशांच्या कडकडाटात आणि लेझीमच्या गजरात ही मिरवणूक काढण्यात आली. "जय भवानी, जय शिवाजी" च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

### मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. विजय पवार, सचिव अशोक मोरे, खजिनदार सुरेखा पवार, मुख्याध्यापिका विद्या नाईक व नायगम अग्नीस यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे पालक व थेरगाव मधील नागरिकांच्या उपस्थितीत सोहळा पार पडला.

> छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि आचार आजच्या पिढीने आत्मसात करणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या शौर्याचा आणि शिस्तीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रगती करावी, हाच या सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे. सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी घेतलेली मेहनत कौतुकास्पद आहे.
>
> - विजय पवार, (संस्थापक अध्यक्ष, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव)